**नमुना दोन**

ग्राम-
दूरध्वनी-02562 -299268
ई मेल- eduprizpdhule@gmail.com /ssadhule@gmail.com
जावक क्र-शिक्षण/RTE शामा/२०३/2026
जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेकार्यालय--शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद धुळे
युडायसक्रमांक- 27020400104
दिनांक- ५/५/2026
व्यवस्थापक:- प्रोग्रेसिव्हरुरल इंन्स्टीट्युत ऑफ टेक्नोलॉजी, शिरपुर, संचलित.

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनयम 2009 यांच्या कलम च्या 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क नियम,2011 यांच्या नियम11, पोटनियम(4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपल्या दिनांक-19/03/2026 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद धुळे दिनांक- 01/04/2025 पासून ते 31/03/2028 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते 8 वी सदाशिवशेठ आर. बाविस्कर इंटरनॅशनल स्कुल,चोपडा फाटा ता.शिरपूर जि.धुळे (शाळेचे नाव व पत्तासह) शाळेस तात्पूरती मान्यता देत आहे.
वरील मान्यता हीखालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1)मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा सलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीतकोणतेही बंधन नसेल.

2) बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र,बालकांना मोफतव सक्तीचा शिक्षणाचाहक्क नियम,2011 (जोडपत्र दोन) मधीलतरतूदीचे शाळा पालन करील.

3) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्याकिमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल. आणि प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल.परंतू आणखी असेकी, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील याप्रमाणकाचे अनुपालनकरण्यात येईल.

4) परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमांच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्तीमिळेल,अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5) संस्था/शाळा कोणतीहीकॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा त्यापैकीकोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याहीबालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिकशिक्षण पूर्णहोईपर्यतकोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्णहोणे आवश्यकअसणार नाही

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येकबालकास, नियम 23अन्वये निर्धारितकेलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यातयेईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारितकेलेली किमान अर्हता धारणकरणा-या शिक्षकांची नियुक्तीकरण्यात येईल. परंतु आणखी असेकी, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमानअर्हता

धारण न करणा-याशिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावीलागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्टकेलेलीत्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पारपाडतील,आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेनेखाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये,याचीसुनिश्चिती शाळाकरील.

8) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाचे आधारेतयार केलेल्या पाठयक्रमाचे पालनकरील.

9) शाळा,अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10) शाळा अधिनियमाचेकलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्यावेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणेहोत्या:-

- -शाळेच्या परिसराचेक्षेत्रफळ-12500 चौ. मी.
- -एकूण बांधकाम क्षेत्र - 18200चौ मी.
- -खेळाच्या मैदानाचेक्षेत्रफळ - 5000 चौ.मी.
- -वर्गखोल्यांची संख्या - 30
- -कार्यालयीन नि-भांडार-नि- मुख्याध्यापकांचीखोली-03
- -मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणिआरोग्यदायी स्थितीतठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. आहे
- -पिण्याच्या पाण्याची सुविधा. - आहे
- -दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर.- 01
- -अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता
- -वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. आहे

11) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्रचालविता येणार नाहीत.

12) शाळेचीइमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगणहे केवळ शिक्षणाच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860,(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिकविश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यातयेत आहे.

14) शाळा कोणत्याहीव्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्ति संघाच्या किंवा इतरकोणत्याहीव्यक्तीच्या फायद्याकरिता किंवाकोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15) शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत. आणिनियमांनुसार योग्य लेखाविवरणपत्रे तयारकरावीत .प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रतदरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

16). तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक**DHL/SHR/PPUA/ENG/P-36** असा आहे.या कार्यालयांशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा,याची नोंद घ्यावी.

17) शिक्षणसंचालक / जिल्हा शिक्षणाधिकारीवेळोवेळी मागणीकरतील असे अहवाल वमाहिती शाळेनेसादर करावीकिंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तताकरण्यासाठीकिंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दूर करण्यासाठीशासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईलअशा सूचनांचे पालन करावे.

18) संस्थेच्या नोंदणीचेकोणतेही असल्यास नूतनीकरणकेल्याचीसुनिश्चित करावी.

19) 'जोडपत्र' तीननुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

(डॉ.मनिष पवार)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद,धुळे